नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २८८ Issue - 288 | वार गुरुवार दि. ६ मार्च २०२५ Blow- Thursday Date 6 March 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## केदारनाथ, हेमकुंड साहिबला 'रोप-वे'

### केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : उत्तराखंडमधील भूस्खलन व इतर नैसर्गिक संकटांचा संबंध विविध विकास प्रकल्पांशी जोडला जात असला तरी, 'रोप वे'सारख्या प्रकल्पांतून केदारनाथ व हेमकुंड साहिब या दोन ठिकाणांच्या धार्मिक पर्यटनाला मोठी चालना देण्याचा निर्णय बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला. या 'रोप वे' प्रकल्पामुळे हेमकुंड साहिबला जाणाऱ्या भाविकांची संख्या १० पटीने वाढेल, अशी माहिती केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत दिली.





केदारनाथला दरवर्षी २० लाखांहून अधिक भाविक जातात. शिखांचे दहावे धर्मगुरू गुरू गोविंदसिंग यांच्यामुळे हेमकुंड साहिबलाही मोठे महत्त्व असून तेथे दरवर्षी किमान दोन लाख भाविक भेट देतात. इथेच 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स' हे प्रसिद्ध पर्यटनस्थळही आहे.

या तीनही ठिकाणी पायी वा खेचरांवर बसून पोहोचता येते. हिमालयातील सातत्याने बदलणाऱ्या हवामानामध्ये हा प्रवास अत्यंत खडतर असतो. मात्र, हे 'रोप-वे' प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अत्यंत सहजपणे भाविकांना व पर्यटकांना तीनही स्थळांना विनासायास पोहोचता येईल. त्यामुळे केदारनाथला जाणाऱ्यांची संख्या ५५ ते ६० लाख तर, हेमकुंड साहिबला जाणाऱ्यांची संख्या वीस लाखांच्या जवळपास पोहचू शकतील.

या प्रकल्पांमुळे हॉटेल्स, रेस्तराँ व इतर पर्यटनविषयक उद्योगांना चालना मिळेल. मात्र, त्यामुळे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील भागांमध्ये मोठे बांधकाम प्रकल्प उभे राहतील, तसेच वाढीव पर्यटकांमुळे उत्तराखंडातील संवेदनशील पर्यावरणावर ताण पडण्याची शक्यता व्यक्त आहे.

## लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याबाबत योग्यवेळी निर्णय; आदिती तटकरे यांच्या विधानाने संभ्रम वाढला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत लाभार्थींना २१०० रुपये देण्याचे आश्वासन महायुतीने दिले असले तरी जाहीरनामा पाच वर्षांसाठी असतो, असे सांगत योग्यवेळी अनुदानात वाढ करण्याचा निर्णय घेतला जाईल, असे महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी विधान परिषदेत स्पष्ट केल्याने वाढीव अनुदान कधी मिळणार याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

लाडक्या बहीण योजनेसाठी देण्यात येणारे २१०० रुपये अनुदान हे अधिवेशन काळात दिले जाईल किंवा त्याची अर्थसंकल्पात तरतूद करु, असे कोणतेही वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले नाही. जाहीरनामा हा पाच वर्षासाठी असतो, असे तटकरे यांनी स्पष्ट केले.

अनुदान कधी दिले जाईल याचे स्पष्ट उत्तर देण्याचे तटकरे यांनी टाळले. लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी देणार या विरोधकांच्या प्रश्नावर त्यांनी विरोधक सत्तेवर आल्यानंतर तीन हजार रुपये कसे देणार होते, असा प्रतिसवाल केला. राज्यातील लाडक्या बहिणींची मते घेऊन सत्तेत आलेले महायुती सरकार लाडक्या बहिणींना अपात्रतेचे निकष आता का लावत आहेत. अर्जांची छाननी करुन लाभ देणाऱ्या अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार? निवडणूकीपूर्वी लाडकी असलेली बहीण सावत्र कशी झाली, अशा प्रश्नांची सरबत्ती शिवसेना ठाकरे पक्षाचे आमदार ॲड. अनिल परब व काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी केली.

फेब्रुवारी व मार्च महिन्यांचे प्रत्येकी १५०० रुपयांचे अनुदान जागतिक महिला दिनी लाभार्थींच्या बँक खात्यात जमा होईल, अशी माहितीही आदिती तटकरे यांनी दिली. फेब्रूवारीचे अनुदान मिळाले नसल्याचा मुद्दा काँग्रेसचे सतेज पाटील यांनी उपस्थित केला होता.

## धनंजय मुंडे यांना सहआरोपी करा! मराठवाड्यात तीन जिल्ह्यांत आंदोलनाने सरकारवर दबाव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



छत्रपती संभाजीनगर : अन्न व नागरी पुरवठा मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर आमदार मुंडे यांना आवादा कंपनीकडून खंडणी प्रकरणात सहआरोपी करण्यासाठीचा दबाव वाढला असून, बीडपाठोपाठ बुधवारी धाराशिव व जालना येथे बंद पाळण्यात आला. धनंजय मुंडे यांच्या सरकारी 'सातपुडा' या निवासस्थानी झालेली बैठक खंडणीसाठी होती, असा आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी केला होता.

विधानसभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी स्वपक्षीय सरकारला जाब विचारला. परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी, जालन्याचे कैलास बोराडे तसेच लातूरमधील माऊली सोट या पीडितांना न्याय कधी मिळणार असा सवाल भुजबळ यांनी केला.

खंडणी प्रकरणातून संतोष देशमुख यांची हत्या झाली असल्याचे दोषारोपपत्र सादर करण्यात आल्याने धनंजय मुंडे यांना सहआरोपी करावे, अशी मागणी करण्यात आली. यासाठी तालुका पातळीवर रास्ता रोको, टायर जाळण्याचे प्रकार झाले. जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यात बंद पाळण्यात आला. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील छायाचित्रे पुढे आल्यानंतर राज्यभर संतापाची लाट उसळली होती. केवळ वाल्मीक (पान ५ वर)

### नामदेवशास्त्रींनी भूमिका बदलली

**संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर गड धनंजय मुंडे यांच्या पाठीशी आहे, असे वक्तव्य करणाऱ्या नामदेवशास्त्री यांनी त्यांची भूमिका बदलली. 'जे वक्तव्य आधी केले त्याबाबत पूर्वकल्पना आपल्याला नव्हती. मात्र दुसऱ्या दिवशी धनंजय देशमुख परिवारासह भेटण्यासाठी आले. देशमुख कुटुंबीयांनी आपल्याला जाण करून दिली असून लोकांनीही गैरसमज करून घेऊ नये. गड देशमुख परिवाराच्या पाठीशी आहे. त्यांना जलदगतीने न्यायालयात न्याय मिळवून द्यावा.'**

(पान १ वरून) कराडच नाही तर या गुन्ह्यामध्ये धनंजय मुंडे यांना पाठीशी घातले जात आहे. अजित पवार यांना सारे प्रकरण माहीत असतानाही त्यांनी मुंडे यांची एवढे दिवस पाठराखण केली. त्यामुळे अजित पवार यांनीही राजीनामा द्यावा, अशा प्रतिक्रियाही बंददरम्यान काही नागरिकांनी व्यक्त केल्या.

आवादा कंपनीकडून खंडणी ही निवडणूक कालावधीमध्ये मागण्यात आली. आमदार सुरेश धस, जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेले प्रश्न आता जिल्हा पातळीवर कार्यकर्ते विचारू लागले आहेत. धाराशिव जिल्ह्यातील भूम, परंडा, कळंब, तुळजापूर, उमरगा या भागात शाळा, महाविद्यालये, दुकाने बंद ठेवण्यात आली होती.

जालन्यात रास्ता रोको

जाफराबाद तालुक्याच्या ठिकाणी बुधवारी बंद पाळण्यात आला. बंदला ८० टक्क्यांपेक्षा अधिक प्रतिसाद मिळाला. सकल मराठा समाजाच्या वतीने बंदचे आवाहन करण्यात आल होते. जालना तालुक्यातील रामनगर येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सकल मराठा समाजाच्या वतीने परतूर येथील उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्या कार्यालयावर बुधवारी उपोषण करण्यात आले.

## कोकाटे यांच्यावरील फसवणुकीचा ठपका कायम; मंत्रिपदी कायम ठेवण्यास विरोधकांचा आक्षेप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला न्यायालयाने स्थगिती दिल्याने त्यांचे मंत्रिपद आणि आमदारकी वाचली असली तरी शासकीय सदनिकेसाठी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी बनावट कागदपत्रे सादर केल्याचा न्यायालयाने ठेवलेला ठपका कायम राहिला आहे. शासनाचीच फसवणूक करणाऱ्या कोकाटे यांना मंत्रिमंडळात कायम ठेवणे कितपत नैतिक आहे, असा सवाल विरोधकांनी केला आहे.

शासकीय सदनिकेसाठी बनावट कागदपत्रे सादर करून शासनाची फसवणूक केल्याने नाशिक न्यायालयाने कोकाटे यांना दोषी ठरवून दोन वर्षांची शिक्षा ठोठावली होती. कोकाटे यांनी फसवणूक केल्याचे न्यायालयात सिद्ध झाले आहे. शासनाची फसवणूक करणारा मंत्रिमंडळात कसा, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. शासनाची फसवणूक केल्याचे न्यायालयात सिद्ध झाले आहे. यातूनच न्यायालयाने कोकाटे यांना दोन वर्षांची शिक्षा ठोठावली होती. तेच कोकाटे मंत्रिमंडळात कायम राहणार आहेत. बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी धनंजय मुंडे यांचा राजीनामा देण्यास भाजपने भाग पाडले. कोकाटे यांनी शासनाची बनावट कागदपत्रे सादर करून फसवणूक केल्याचे न्यायालयात सिद्ध झाले आहे. मग मुंडे यांचाच न्याय कोकाटे यांना का नाही, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.



कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका बळकावल्या असल्याने न्यायालयाने त्यांना दोन वर्षे तुरुंगवासाची शिक्षा सुनावली असूनही ते मंत्रिपदी कसे, त्यांच्याबाबत नैतिकता पाळली जाणार नाही का, असा सवाल शिवसेना (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी केला.

## होळीत एसटी प्रवाशांचा प्रवास रखडणार, एसटी कर्मचाऱ्यांचे राज्यभरात निदर्शन आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य परिवहन (एसटी) कर्मचाऱ्यांच्या विविध आर्थिक मागण्या प्रलंबित आहेत. या मागण्यांची पूर्तता व्हावी यासाठी एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांनी बुधवारी राज्यातील सर्व आगार, विभागाच्या मुख्यद्वारावर आंदोलन केले. या आंदोलनाची दखल एसटी महामंडळ, राज्य सरकारने न घेतल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेने दिला होता. त्यामुळे येत्या होळीदरम्यान कर्मचाऱ्यांचे मोठे आंदोलन सुरू झाल्यास बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांचे प्रचंड हाल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एसटी कामगारांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीचा दर लागू आहे. महागाई भत्याची २०१८ सालापासून थकबाकी प्रलंबित आहे. न्यायालयाने थकबाकी देण्याबाबतचा निर्णय दिल्यानंतरही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. आता शासकीय कर्मचाऱ्यांना जुलै २०२४ पासून महागाई भत्याचा दर ५३ टक्के लागू केला असून महागाई भत्ता थकबाकी फेब्रुवारी २०२५ देय मार्च २०२५ च्या वेतनात देण्यात आली आहे. मात्र एसटी कामगारांना महागाई भत्ता अद्याप ४६ टक्केच दिला जात आहे. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे ५३ टक्के महागाई भत्ता एसटी कामगारांना थकबाकीसह लागू करण्यात यावा. तसेच घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीची थकबाकी एप्रिल २०१६ ते ऑक्टोबर २०२१ पर्यंत प्रलंबित आहे. ती मिळणे आवश्यक आहे, असे महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेद्वारे सांगण्यात आले.



तसेच भविष्य निर्वाह निधीची उचल वेळेवर द्या, जाचक शिस्त व आवेदन कार्यपध्दती रद्द करा, प्रवाशी भाड्यामध्ये केलेल्या भावाची अंमलबजावणी करताना पूर्वीप्रमाणेच पाचच्या पटीत वाढ करा, आरटीओ विभागाकडून चालकाचा दोष नसताना केलेली दंडात्मक कारवाई रद्द करा, असे महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी सांगितले.

महामंडळाची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर थकबाकीबाबत महामंडळ निर्णय घेईल, असे प्रशासनाने लेखी पत्राव्दारे संघटनेला कळविले आहे. मात्र संघटनेचा त्यास ठाम विरोध असून एसटीची अशी आर्थिक स्थिती निर्माण होण्यास कामगार जबाबदार नाहीत. कामगारांची देय थकबाकी, प्रलंबित महागाई भत्याची थकबाकी, घरभाडे भत्याची थकबाकी, वार्षिक वेतनवाढीची थकबाकी व वाढीव वेतनाचा हप्ता कपात न करता तसाच पुढे सुरू ठेवावा. या व प्रशासकीय पातळीवर मान्य केलेल्या महत्त्वपूर्ण बाबींची पूर्तता न झाल्यास पुढील काही दिवसांत तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे संदीप शिंदे यांनी सांगितले

### द. आफ्रिकेचा उपांत्य फेरीत दारूण पराभव

### ९ विकेटस् गमावत केल्या ३१२ धावा

## चॅम्पियन्स ट्रॉफी फायनलचे दोन संघ ठरले! भारत-न्यूझीलंड भिडणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या उपांत्य फेरीत न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा धावांनी दारूण पराभव करत अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. आता चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना भारत वि. न्यूझीलंड या संघांमध्ये होणार आहे. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील विक्रमी धावसंख्या उभारत दक्षिण आफ्रिकेच्या संघाला मोठं आव्हान दिलं होतं. पण सातत्याने विकेट्स गमावल्याने आफ्रिकेचा संघ मागे राहिला. पण दक्षिण आफ्रिकेकडून डेव्हिड मिलरने अखेरच्या चेंडूवर शतक पूर्ण करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.

भारत वि. न्यूझीलंड यांच्यातील सामना दुबईत ९ मार्चला खेळवला जाणार आहे. भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाला उपांत्य फेरीत ४ विकेट्सने पराभूत करत आधीच अंतिम फेरीत स्थान मिळवले होते. तर आता न्यूझीलंडने आफ्रिकेला पराभूत करत फायनलचं तिकिट मिळवली.

न्यूझीलंड संघाने दिलेल्या ३६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेचा संघ ९ विकेट्स गमावत ३१२ धावाच करू शकला. उत्कृष्ट लयीत असलेला रायन रिकल्टन १७ धावा करत बाद झाला. तर कर्णधार टेम्बा बावुमा आणि रॅसी व्हॅन डेर ड्युसेन यांनी चांगली भागीदारी रचली पण संघाला विजयापर्यंत नेऊ शकले नाही. बावुमाने ७१ चेंडूत १ षटकार आणि ४ चौकारांसह ५६ धावा केल्या आहेत. तर ड्युसेनने ६६ चेंडूत २ षटकार आणि ४ चौकारांसह ६९ धावा केल्या. आफ्रिकेला सर्वात मोठा धक्का बसला तो म्हणजे क्लासेनच्या रूपात. क्लासेन ३ धावा करत बाद झाला. मारक्रम चांगल्या लयीत होता पण तो ३१ धावा करत बाद झाला.



मिलर वगळता आफ्रिकेच्या खलच्या फळीतील कोणालाच मोठी कामगिरी करता आली नाही. पण डेव्हिड मिलरने अखेरच्या चेडूवर आपले शतक पूर्ण केले. मिलरने अवघ्या ६७ चेंडूत १० चौकार आणि ४ षटकारांसह शतक पूर्ण केले. न्यूझीलंड संघाच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करत संघाला विकेट मिळवून दिल्या. मॅट हेन्री आणि ग्लेन फिलीप्सने प्रत्येकी २ विकेट घेतले. तर कर्णधार मिचेल सँटनरने सर्वाधिक ३ विकेट्स घेतले. मायकेल ब्रेसवेल आणि रचिन रवींद्र यांना १-१ विकेट घेता आली.

न्यूझीलंड संघाने या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या ३६२ धावा उभारल्या. न्यूझीलंडकडून रचिन रवींद्र आणि केन विल्यमसनने संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. रचिनने १०८ धावा तर विल्यमसनने १०२ धावा करत या दोन्ही खेळाडूंनी आपआपली शतकं पूर्ण केली. यानंतर डॅरिल मिचेल आणि ग्लेन फिलीप्स यांनी वादळी फलंदाजी करत ४९-४९ धावांची खेळी केली. तर मायकेल ब्रेसवेलने १६ धावा केल्या.

न्यूझीलंडच्या फलंदाजांवर वचक बसवण्यात आणि झटपट विकेट्स घेण्यात आफ्रिकेचे गोलंदाज अपयशी ठरले आणि त्यांना इतक्या मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. आफ्रिकेकडून लुंगी एनगिडीने ३ विकेट्स, रबाडा २ विकेट्स तर वियान मुल्डर एक विकेट घेऊ शकले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### भाविकांना दिलासा

केदारनाथला दरवर्षी २० लाखांहून अधिक भाविक जातात. शिखांचे दहावे धर्मगुरू गुरू गोविंदसिंग यांच्यामुळे हेमकुंड साहिबलाही मोठे महत्त्व असून तेथे दरवर्षी किमान दोन लाख भाविक भेट देतात. इथेच 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स' हे प्रसिद्ध पर्यटनस्थळही आहे. या तीनही ठिकाणी पायी वा खेचरांवर बसून पोहोचता येते. हिमालयातील सातत्याने बदलणाऱ्या हवामानामध्ये हा प्रवास अत्यंत खडतर असतो. मात्र, हे 'रोप-वे' प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अत्यंत सहजपणे भाविकांना व पर्यटकांना तीनही स्थळांना विनासायास पोहोचता येईल. त्यामुळे केदारनाथला जाणाऱ्यांची संख्या ५५ ते ६० लाख तर, हेमकुंड साहिबला जाणाऱ्यांची संख्या वीस लाखांच्या जवळपास पोहचू शकतील. उत्तराखंडमधील भूस्खलन व इतर नैसर्गिक संकटांचा संबंध विविध विकास प्रकल्पांशी जोडला जात असला तरी, 'रोप वे'सारख्या प्रकल्पांतून केदारनाथ व हेमकुंड साहिब या दोन ठिकाणांच्या धार्मिक पर्यटनाला मोठी चालना देण्याचा निर्णय बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला. या 'रोप वे' प्रकल्पामुळे हेमकुंड साहिबला जाणाऱ्या भाविकांची संख्या १० पटीने वाढेल. अशी माहिती केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच पत्रकार परिषदेत दिली. या प्रकल्पांमुळे हॉटेल्स, रेस्तराँ व इतर पर्यटनविषयक उद्योगांना चालना मिळेल. मात्र, त्यामुळे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील भागांमध्ये मोठे बांधकाम प्रकल्प उभे राहतील, तसेच वाढीव पर्यटकांमुळे उत्तराखंडातील संवेदनशील पर्यावरणावर ताण पडण्याची शक्यता व्यक्त आहे. एकंदरीत या निर्णयामुळे भाविकांना मात्र दिलासा मिळाला आहे.

# नाशिकमध्ये नागरीकांच्या सतर्कतेमुळे जनावराचे मांस वाहतूक करणारा कंटेनर सह ८० लाखांचा मुद्देमाल जप्त

## उभ्या कंटेनरमधून येत होता उग्र वास; चालक अटकेत, गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/ प्रतिनिधी : नाशिक मधील मुंबई-आग्रा महामार्गावर मोठ्या प्रमाणात गोमांस वाहतूक होत असल्याचे समजताच पोलिसांनी कारवाई करत वातानुकूलित कंटेनरमधून ८० लाख ११ हजार ५०० रुपयांचे जनावराचे मांस जप्त केले. तसेच, कंटेनर चालकाला अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिसांनी ८०,११,५०० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यात ६५,११,५०० किमतीचे १४४७ बॉक्स व १५,००,००० किमतीचा अशोक लेलँड कंपनीचा कंटेनर MH ४६ R ०७९७ यांचा समावेश आहे.



नाशिक येथील नागरीक बजरंग दलाचे सतर्क कार्यकर्ते विजय चव्हाण हे आपल्या दुचाकीवरून जात असताना गरवारे रोडजवळ महामार्गावर एक मोठा कंटेनर उभा असल्याचे त्यांच्या लक्षात आले. कंटेनरखाली पाणी साचले होते. आणि त्यातून उग्र वास येत असल्याने त्यांनी संशय व्यक्त करून चालकाकडे चौकशी केली. मात्र, चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांनी तात्काळ पोलिसांना कळवले.एमआयडीसी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पंच व शासकीय पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कंटेनरची तपासणी करण्यात आली. यावेळी कंटेनर वातानुकूलित असल्याचे आढळले. त्यात एकावर एक ठेवलेली एकूण १,४४७ कार्टून्स सापडली. काही बॉक्स उघडून पाहिल्यावर त्यामध्ये जनावराचे मांस असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी नमुने गोळा करून न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे पाठवले आहेत. चालक दुर्गेश पन्नालाल जैस्वाल (वय २५, रा. उरण, नवी मुंबई) याने सदर माल मालेगाव येथून भरल्याचे आणि तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई येथे पोहोचवायचा असल्याचे सांगितले. मात्र, त्याच्याकडे कोणतेही अधिकृत दस्तऐवज, परवाने किंवा बिल नव्हते. त्यामुळे पोलिसांनी संपूर्ण माल जप्त केला आणि चालकाला अटक केली. या प्रकरणी कलम ३२५, ३(५) सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम ५(अ), ५(क), ९(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शेवाळे करत आहेत. या घटनेमुळे नाशिकमध्ये जनावराचे मांस वाहतुकीचा मोठा रॅकेट सक्रिय असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी सखोल तपास करावा अशी मागणी गोरक्षकांनी केली आहे.यावेळी राष्ट्रीय बजरंग दलाचे कार्यकर्ते, विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्या सह हिंदुत्ववादी संघटनाचे शेकडो नागरीकांनी जय श्रीराम च्या घोषणा देत कार्यवाही करण्यास भाग पाडले.

# नळदुर्ग येथील बौद्ध विहाराचे काम अनेक महिन्यापासुन रखडले



- **नगर प्रशासनाने या कामाकडे दुर्लक्ष न करता या कामाची जबाबदारी स्विकारावी**
- **पवित्र बौद्ध विहाराच्या कामात पारदर्शकता आसावी, नाहीतर चोराच्या हातात कोलीत देऊ नये**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग येथील बौद्ध विहाराचे काम गेल्या १ वर्षा पासुन रखडले आहे गेली अनेक दिवसा पासुन प्रशानाने जाणीव पुर्वक या बौद्ध विहाराच्या कामाकडे दुर्लक्ष केले आहे बौद्ध विहाराच्या कामावर करोडो रुपये खर्च केले जाताहेत मग वर्षाला एक कॉलम कशासाठी ऐवढे थंड काम कशासाठी व का? आसा सवाल जनतेतुन उपस्थित केला जातोय.

एक वर्ष होऊन गेले तरी पण भागवत थेअटरचे काम चालू झाल्या सारखे वाटत आहे हे काम कशामुळे थंड अवस्थेत चालू आहे हे लक्षात येत नाही.

बौध्द विहार हे पवित्र ठिकाण म्हणून ओळखले जाते या पवित्र ठिकाणाच्या कामात पारदर्शकता आणण्या साठी नगर परिषदेने जातीने व प्रामाणिक लक्ष वेधून बौद्ध विहाराचे काम करण्यासाठी प्रयत्न करावा.

कारण गावात गुत्तेदाराची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे प्रत्येक गुत्तेदार किती दर्जे दार कामे करतात हे सर्वांना माहिती आहे याच अनुषंगाने नगर परिषदेने मात्र चोराच्या हातात कोलीत देऊ नये आशा प्रकारची मागणी केली जात आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते परंतू बौद्ध विहाराच्या कामाचा वेग कमी झाला आहे म्हणून आता तेथील जयत्तीचे कार्यक्रमाचे आयोजन कुठे करायचे हा प्रश्न मात्र ऐरीणीवर आला आहे .या सर्व गोष्टींचा विचार करत नागरिकात मात्र नाराजीचा सूर लावला आहे

किमान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती पर्यंत बौद्ध विहाराचे काम पुर्ण होईल का ? आशा प्रकारचा सवाल भिमसैनिकांतुन होत आहे .

आता बघुया नगर परिषद करोडो च्या कामात किती पारदर्शकता आणण्यासाठी काय प्रयत्न करत आहे हेच पाहावे लागेल .

# हत्तरसंग कुडल येथील संगमेश्वर मंदिरातील मराठी भाषेतील शिलालेखाने इतिहास घडविला : डॉ. अरुणचंद्र पाठक




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सोलापूर जिल्ह्यातील हत्तरसंग कुडल येथील संगमेश्वर मंदिरातील तुळईवर मराठी भाषेत कोरलेला शिलालेखाचा मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी उपयोग झाला, त्यामुळे खऱ्या अर्थाने इतिहास घडला. या शिलालेखा मुळेच मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असे प्रतिपादन केंद्रीय अभिजात भाषा दर्जा समितीचे सदस्य पुरातत्त्व संशोधक डॉ अरुणचंद्र पाठक यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयतील इतिहास विभागाने आयोजित केलेल्या सत्कार समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते, व्यासपीठावर संचालक मल्लिनाथ मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक कुलकर्णी, विशाल फुटाणे उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी असलेल्या अटीमध्ये भाषा अडीच हजार वर्षांपूर्वीची असावी अशी अट होती. त्यावेळी फार मोठी समस्या निर्माण झाली, अशा वेळी सातवाहन राजा हाल याने लिहिलेला गाथा सप्तशती चा आधार घेण्यात आला, परंतु त्याहीपेक्षा ज्येष्ठ इतिहास संशोधक स्वर्गीय आनंद कुंभार यांनी शोधून काढलेला दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग कुडल येथील हेमाडपंती संगमेश्वर मंदिरातील मराठी भाषेतील अडीच हजार वर्षांपूर्वीचा शिलालेख उपयोगी पडला, असे मोठे विधान करत त्यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्यास मान्यता दिली. असे गौरवोद्गार काढले. त्यावेळी सोलापूर जिल्ह्याची महानता सर्वांना समजली असे ही त्यांनी यावेळी सांगितले.

**मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात इतिहास विभाग आयोजित कार्यक्रम**


**हत्तरसंग कुडल येथे साहित्य संमेलन तसेच इतिहास परिषदा व्हाव्यात**

**संगमेश्वर मंदिरातील मराठी भाषेतील पहिल्या शिलालेखाचा आम्हास अभिमान आहे, स्वर्गीय आनंद कुंभार यांनी तो मंदिरातील तुळई वरील शिलालेख शोधून काढला, त्यामुळेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला त्या ठिकाणी मराठी साहित्यिकांचे संमेलन, इतिहास परिषदा होणे गरजेचे आहे असे मत मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.**

मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, मराठीचा अभिमान राज्यातील नागरिकांना आहे, मराठी भाषा ही अभिजात भाषा व्हावी यासाठी शर्तीचे प्रयत्न झाले. परंतु संगमेश्वर मंदिरातील तुळई वरील मराठी भाषेतील शिलालेखांमुळे अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही कौतुकास्पद बाब आहे. त्यामुळे मंदिर मूर्ती शिल्प शिलालेख ताम्रपट नाणी यांचे जतन, संवर्धन करणे हे सर्वांचे कर्तव्य आहे. या कार्यक्रमास प्रा राजशेखर पवार, प्रा भीम सोनकांबळे व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे यांनी केले आभार इतिहास विभाग प्रमुख प्रा मधुबाला लोणारी यांनी मानले.

# शहाड येथील अध्यात्मिक गुरू श्री संत चिंतामणी महाराज यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



उल्हास-नगर (प्रतिनिधी) : सौराष्ट्र गिरनार पर्वत जुनागड सद्गुरू श्रीदत्त महाराज यांच्या पर्वतावर अनेक वर्ष तपस्या करून सिद्धी प्राप्त करून लोककल्याणासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लोकसेवा करणे अध्यात्मिक गुरू श्री त्रिमूर्ती नवनाथ दत्त मंदिराचे संस्थापक संत श्री चिंतामणी गटूजी बागुल महाराज शहाड उल्हासनगर जि. ठाणे यांचे निधन वयाच्या ९५ व्या वर्षी दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री ०९:०० वाजता झाले होते. महाशिवरात्री दिवशी म्हणजेच २६ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री चिंतामणी महाराजांना शास्त्रानुसार विधीवत पूजन करून नवनाथ दत्त मंदिराच्या परिसरात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून समाधी देण्यात आली. हजारो भक्ताच्या उपस्थितीत शिस्तबध्द पध्दतीने त्यांना सायंकाळी ०६:०० वाजता माती देण्यात आली.

यावेळी समाजातील अनेक नामवंत व्यक्ती उपस्थित राहिले होते.

श्री संत चिंतामणी महाराज यांचा दरबार दर रविवार मंगळवार आणि गुरुवार असा चालायचा. लोकांचे दुःख दूर करून त्यांना मानवतेचा संदेश देऊन कोणताच मोबदला न घेता. अखंड आयुष्यभर लोकसेवा करीत राहिले.

मकरसंक्रांती, गुढीपाडवा, महाशिवरात्री, श्रावणी अमावस्या, श्री दत्तगुरू जयंती इत्यादी उत्सव मोठ्या प्रमाणात शहाड येथील दत्त मंदिरात मोठ्या भक्तीभावाने साजरा होत असायचे याच सणाच्या दिवशी हजारो भक्तांना महाप्रसाद व भंडारा दिला जात होता. मानवतेच्या कल्याणासाठी श्री संत चिंतामणी महाराजांनी खूप लोकसेवा केली होती. त्यांच्या श्रीदत्त मंदिराच्या दर्शनासाठी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख दिवंगत धर्मवीर आनंद दिघे साहेब पासून ते सध्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, तसेच भाजपा आमदार कुमार आयलानी, गोवाचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत, नवी मुंबईचे आमदार तथा पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक, संदीप नाईक, माजी खासदार संजीव नाईक, राजन विचारे असे अनेक नेते मंडळी श्री संत चिंतामणी महाराज यांच्या दरबारी आशीर्वाद घेण्यासाठी आर्वजून उपस्थित राहत असे.

श्री संत चिंतामणी महाराज यांच्या निधनाने तपस्वी अध्यात्मिक गुरू हरपल्याची भावना भक्तांमध्ये शोककळा पसरली आहे.

त्यांच्या आत्म्याला शांती समाधान मिळो यासाठी असंख्य भक्तांनी प्रार्थना केलेली आहे. याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्री संत चिंतामणी महाराज यांना आदरांजली अर्पण केलेली आहे. याप्रसंगी रवींद्र बागुल, भरतरी बागुल, सोमनाथ बागुल, माजी नगरसेवक नाना बागुल, उल्हासनगरचे आमदार कुमार आयलाणी, ड सुशील भालेराव, ड. प्रज्ञेश सोनावणे, ड. कमलेश साळवे, साताऱ्यातील साळुंके बाबा, भिवंडीतील भोईर बाबा, श्याम तिवारी, इत्यादी भक्तगण उपस्थित होते.

## पुरस्कारामुळे मंगळवेढा पोलिसांची मान उंचावली

## सर्वच क्षेत्रातून होतेय अभिनंदन

# मंगळवेढ्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रेय बोरी गिड्डे यांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट सेवेचा पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेली पोलीस निरीक्षक दत्तात्रेय बोरी गिड्डे यांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट सेवेचा पुरस्कार मिळाला असून याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

हा पुरस्कार शिरोळ पोलीस स्टेशन येथे कार्यरत असताना केलेल्या विविध कार्याबद्दल त्यांना मिळाला आहे.




मंगळयाचे विद्यमान पोलीस निरीक्षक दत्तात्रेय बोरी गिड्डे हे येथे येण्यापूर्वी कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ पोलीस स्टेशनला सन २०२१ ते २०२३ च्या कालावधीत कार्यरत होती यादरम्यान पोलीस महासंचालक कार्यालयातून आलेल्या सूचनेच्या अनुसार अनुषंगाने. पोलीस निरीक्षक बोरी गिड्डे यांनी त्यांच्या कारकीर्दीस दाखल गुन्हे उघडकीस आणून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला. होता. मग गुन्हेगाराची शिक्षाही झाल्या होत्या. यावेळी त्यांना पुरस्कार देण्यात आले होते.

महासंचालकाने पाठवला होता ते मूळचे सांगली जिल्ह्यातील असून २००५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या परीक्षेत यशस्वी होऊन सेवत दाखल झाली आतापर्यंत त्यांना शंभरच्या पुढे रिवार्ड मिळाल्याचे सांगण्यात आले राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याने सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर मंगळवे चे डिवायएसपी विक्रांत गायकवाड व सहकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अभिनंदन केले.

पोलीस निरीक्षक बोर्ड हे मागील महिन्यात मंगळयाला बदलून आले असून या पुरस्कारामुळे मंगळवेढाच्या पोलीस दलाची मान उंचावली आहे.

मंगळवे जी पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरी गिड्डे यांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट सेवेचा पुरस्कार व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला व यावेळी गृहराज्यमंत्री योगेश कदम ग्रह मंत्री डॉक्टर पंकज भोईर मुख्य सचिव सुजाता सैनिक व ग्रह विभागाचे अप्पर सचिव पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई व पोलीस आयुक्त विवेक फळ सानकर, आशुतोष डोंगरे यांच्यासह वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

**थोडक्यात...**

## विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या तिमाही बैठकीचे १० मार्च रोजी आयोजन

सोलापूर : पुणे विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची तिमाही बैठक सोमवार १० मार्च २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयाच्या नवीन इमारतीत सभागृह क्र.१ येथे आयोजित करण्यात आली असल्याचे विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे सदस्य सचिव तथा प्र.महसूल अपर आयुक्त समिक्षा चंद्राकार यांनी कळविले आहे.

प्रत्येक तीन महिन्यातून एकदा त्या महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी लोकशाही दिन झाल्यानंतर भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक घेण्यात येते. या बैठकीत तीन महिन्यांत समितीकडे आलेल्या तक्रारी व त्यावर केलेल्या उपाययोजनांबाबत आढावा घेण्यात येतो, असेही प्र.महसूल अपर आयुक्त समिक्षा चंद्राकार यांनी कळविले आहे.

# सोलापूर विभागीय हातमाग कापड स्पर्धा संपन्न

## विभागीय हातमाग कापड स्पर्धेसाठी ६३ विणकरांचा सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर व प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने विभागीय हातमाग कापड स्पर्धा कार्यक्रम सोलापूर जिल्हा यंत्रमाग धारक संघ, अक्कलकोट रोड एम आय डी सी. सोलापूर येथे संपत्र झाला. विभागीय हातमाग कापड स्पर्धा करीता सहकारी संस्था व खाजगी विणकर सह एकूण ६३ विणकरांनी सहभाग घेवून त्यांनी उत्पादीत केलेल्या परंपरागत व अपरंपरागत वाण सादर केले.



राज्यातील हातमाग व्यवसायातील हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्यासाठी हातमाग विणकर सहकारी संस्था, स्वयंसहाय्यता गट व खाजगी क्षेत्रातील हातमाग विणकरांसाठी हातमाग कापड स्पर्धा व बक्षिस योजना राबविण्यात येते. सदर कापड स्पर्धेकरीता हातमाग विणकरांनी हातमागावर विणलेल्या पारंपारीक व अपारंपारीक डिझाईनच्या अतिउत्कृष्ट नाविण्यपुर्ण व कलात्मक वाणाची प्रदर्शीत वाणामधून निवड करुन उत्कृष्ट वाणास प्रोत्साहनपर बक्षिस देवून हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्याअनुषगाने पारंपारीक व अपारंपारीक वाणाचे कापड उत्पादन करणाऱ्या विणकरांकरीता सन २०१६-१७ पासून विभागीय स्तरावर विभागीय हातमाग कापड स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

शासनाने दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये हि स्पर्धा विभागीय हातमाग कापड स्पर्धा असे नामकरण करुन, विभागीय स्तरावर आयोजित करण्याचे निश्चित केलेले आहे प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, सोलापुर याच अधिपत्याखालील जिल्ह्यासाठी सोलापूर जिल्ह्यासह सांगली, कोल्हापूर, सातारा व पुणे या जिल्ह्यातील प्राथमिक हातमाग विणकर सहकारी संस्था, स्वयंसहाय्यता गट व खाजगी क्षेत्रातील हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्यासाठी हातमाग कापड स्पर्धा पार पाडण्यात आली.

विभागीय हातमाग कापड स्पर्धामध्ये सादर केलेल्या वाणाचे शासनाने नियुक्त केलेल्या निवड समितीने विणकरानी उत्पादीत केलेला वाणाचे अत्युत्कृष्ट, कलात्मक, नाविन्यपूर्ण, रंगसगतीयुक्त आणि कलाकौशल्य पूर्ण असलेल्या वाणाची निवड करुन श्री काशिनाथ महादेव सातलगांव व श्री विठोबा तिपण्णा मोने या विणकरांना प्रथम पारितोषीक (विभागून), श्री अशोक सुरेश टिपरे श्रीनिवास इरण्णा मोने, राजेंद्र अंकम सो सुजाता सोमा याना द्वितीय पारितोषीक (विभागून) व सो अश्विनी नदाल श्री महेश सुचू, श्रीधर कटकूर, शरण्णाप्पा म्हेत्रे, लाडप्पा मड्डे याना तृतीय (विभागून) असे एकूण ११ स्पर्धाकाना प्रशस्तीपत्रक व बक्षीस पात्र धनादेशाचे वितरण करण्यात आले.

विभागीय हातमाग कापड स्पर्धा निवड समितीत विभागीय आयुक्त. (महसूल) पुणे हे अध्यक्ष असून, जिल्हा माहिती अधिकारी, संचालक विणकर सेवा केंद्र मुंबई, सहाय्यक आयुक्त, सोलापूर हे सदस्य असून प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, सोलापुर आहेत सदर विभागीय कापड स्पर्धाचे आयोजन, तहसिलदार (करमणूक शुल्क) सोलापूर श्रीमती शिल्पा ओसवाल यांचे अध्यक्षतेखाली व प्रशासक सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बैंक लि. सोलापूर कुंदन भोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत, जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर व विणकर सेवा केंद्र, मुंबई या कार्यालयाच्या वतीने वी एस यादव, मनिष पौनिकर, तांत्रिक सहाय्यक ए.सी कोकल, व सहाय्यक उपआयुक्त निलेश निखाडे, यांचे उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तांत्रिक अधिकारी ए. एम गोरे यानी केले.

# राजकीय अस्तित्वासाठी परिचारक समर्थकांची पोटसूळ

## आमदार अभिजीत पाटील समर्थकांनी अनेक प्रश्न उपस्थित करत आमच्या नेत्यांवर खालच्या भाषेत टीका केली तर जशास तसे उत्तर देण्याचा दिला इशारा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : पंढरपुर येथे तब्बल आठ वर्षानंतर पार पडलेल्या आमसभेवरून समाज माध्यमांवरून आमसभेच्या अध्यक्षाविरोधात आणि उपस्थित आमदारांविरोधात परिचारक समर्थकांकडून आक्षेप नोंदवण्यात आले होते.

यानंतर सोमवारी माजी आमदार प्रशांत परिचारक समर्थकांनी पत्रकार परिषद घेऊन आमसभेचा निषेध करत आ. अभिजीत पाटील, आ राजू खरे यांच्यावर केलेल्या आरोपानंतर मंगळवारी आमदार अभिजीत पाटील समर्थकांनी पत्रकार परिषद घेऊन परिचारक समर्थकांचा चांगला समाचार घेतला.

आमदार अभिजीत पाटील समर्थकांच्या पार पडलेल्या पत्रकार परिषदेत मागील अनेक वर्षांपासून सामान्य नागरिकांना प्रश्न मांडण्यासाठी आमसभा घेण्यात आली नाही.

आठ वर्षानंतर आमसभा घेऊन आमदार अभिजीत पाटील यांनी सर्वसामान्य नागरिकांना प्रश्न मांडण्याची संधी दिली.

सदर आमसभा जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने आमसभेचा अध्यक्ष निवडून नियमानुसार घेण्यात आली.

आमसभेसाठी ४० हुन अधिक खात्याचे अधिकारी उपस्थित होते. यामध्ये सर्वसामान्य नागरिकांचे अनेक प्रश्न मार्गी लागल्यामुळे आमसभेने चारही आमदारांचा अभिनंदनचा ठराव मांडला.

मात्र परिचारक समर्थकांनी आपले अस्तित्व संपत चालल्याने आमसभेचा निषेध करून आपले राजकीय अस्तित्वाला धोका निर्माण होत असल्याने पोटसुळ उठला असल्याचे दाखवून दिले आहे.

आधी त्यांनी मागील पंचवीस वर्षात काय काम केले ते सांगावे. त्यांनी संस्थांची वाट लावली असल्याची टीका आमदार अभिजीत पाटील समर्थकांनी केली.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले, किरणराज घाडगे, संदीप मांडवे, नागेश गंगेकर, अनिता पवार, अमर सूर्यवंशी, प्रशांत शिंदे, तुकाराम मस्के, महादेव तळेकर,गणेश ननवरे, विशाल आर्वे, उपस्थित होते.

यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले म्हणाले की आठ वर्षानंतर शासकीय नियमानुसार आमसभा पार पडली.

यामध्ये ग्रामीण आणि शहरातील प्रश्न मांडण्यात आले. जास्तीत जास्त ग्रामीण भागातील नागरिकांना प्रश्न मांडण्याची संधी दिली गेली. महिलांनाही प्रश्न मांडण्याची संधी मिळाली. यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागले. शहरात लवकरच नगरपालिकेचे दवाखाने, सर्व शाळा सुरू होतील. पाण्यावर अधिकचा टॅक्स लागणार नाही. या आमसभेत नागरिकांसाठी ६ कोटी रुपयांचा काय झाला.

मात्र शहरातील सुरू असलेल्या ११ रस्त्यांबाबत प्रश्न उपस्थित केल्याने आणि आपले राजकीय अस्तित्वाला धोका निर्माण होऊ लागल्याने परिचारक समर्थकांनी अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आमसभेचा निषेध केला आहे. असा आरोप करत मागील अनेक वर्षांपासून नगरपालिकेवर प्रशासक असल्याने त्यांना बोलण्याचा अधिकार नाही असा सवाल उपस्थित करत त्यांनी १८० कोटी नगरपालिकेचे वार्षिक बजेट असताना यावर नागरिकांनी बोलू नये का? शहरातील नागरिक कर भरत आहेत. मात्र अनेक वर्षांपासून शहरातील नगरपालिकेचे दवाखाने बंद,बागा बंद, क्रीडांगण नाहीत. रस्त्याची दुरावस्था झाली आहे, शहरात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. नगरपालिकेवर २५ वर्ष परिचारक पार्टीची सत्ता असताना काय केले ते सांगा असा प्रतिसावाल केला.

यावेळी बोलताना किरण घाडगे यांनी नागरिकांना दूषित पाणी पुरवठा होत आहे. शहरात सुरू असलेल्या कामांमध्ये कमिशन जास्त घेतले जात असल्याने निकृष्ट दर्जाचे काम होत आहेत. एकाच ठेकेदाराला वारंवार काम दिले जात आहे. असा आरोप करत. यावर बोलण्याचा अधिकार नाही का? असा सवाल उपस्थित केला. याबाबत शहरातील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी धाडस दाखवून आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर शहरात आमसभा घ्यावी अशी मागणी केली.

यावेळी संदीप मांडवे म्हणाले की मालकशाही उध्वस्त करण्याच्या उद्देशाने आणि नगरपालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आमसभा घेण्यात आली नव्हती तर ती जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी होती. मात्र विरोधक काहीही बोलत आहेत. एक महिन्यांपूर्वी आमसभा घेण्याचे आदेश अधिकाऱ्यांना आले होते.

तरी देखील नागरिकांच्या प्रश्नांवर त्यांना उत्तर देता आले नाही. काही अधिकारी गैरहजर होते. याचा निषेध विरोधकांनी केला पाहिजे होता. मात्र ते अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहेत.

आ.अभिजीत पाटील यांनी पंढरपूर तालुक्याशी संबंधित चारही आमदारांना एकत्र आणल्याने त्यांना दुःख झाले असेल अशी मार्मिक टीका करत आम्ही कोणालाही टार्गेट करत नाही परंतु आमच्या नेत्यांवर खालच्या भाषेत टीका केली तर जशास तसे उत्तर देऊ असा इशारा दिला.

यावेळी विठ्ठलचे संचालक तुकाराम मस्के म्हणाले की ऊस दरावर प्रश्न विचारण्यात आले, आमसभेचा निषेध करण्यात आला, मात्र विरोधकांना माहीत नाही की आ. अभिजीत पाटील यांनी जिल्ह्यात सर्वात जास्त आत्तापर्यंत गळीत हंगामाचे २८०३ रुपये दर सर्व शेतकऱ्यांना देण्याचे काम केले आहे. पुढील काळात सर्व जाहीर केलेला दर मिळेल. मात्र परिचारकांच्या भोवती साईड हिरोची भूमिका बजावणारे उगाच टीवटीव करत असल्याचे टीका केली.

# १७ मार्च रोजी च्या महाबोधी विहार मुक्ती आंदोलनाचे निवेदन इंदापूर तालुक्याचे तहसीलदार व इंदापूर चे पोलीस निरीक्षक यांना सादर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : आज मंगळवार दि.४ मार्च २०२५ रोजी समस्त बौध्द बांधवांच्या वतीने इंदापूर चे तहसीलदार व इंदापूर चे पोलीस निरीक्षक यांना बोधगया येथील महाबोधी विहार (ब्राह्मण प्रशासनाच्या विरोधातील)मुक्ती आंदोलनाच्या समर्थनात... आंदोलनाचे निवेदन देण्यात आले.



या निवेदनात म्हटले आहे की, महाबोधी विहार हे एक जागतिक बौद्ध विहार, ऐतिहासिक स्मारक आणि पर्यटन स्थळ आहे. बौध्दांची पवित्र वास्तु आहे. असे असताना येथे ब्राह्मण प्रशासनाने कब्जा केला आहे त्यामुळे याच्या विरोधात बोधगया येथे बौद्ध भिक्खूंचे आंदोलन चालू आहे. त्या आंदोलनाला संपूर्ण भारतातुन व जगभरातुन पाठींबा मिळत आहे. आम्हीसुद्धा बोधगया येथे चालू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देत असुन त्या आंदोलनाच्या समर्थनार्थ आम्ही बौद्ध बांधव सोमवार दि. १७ मार्च २०२५ रोजी इंदापुरमध्ये आंदोलन करीत आहोत.

**आमच्या प्रमुख मागण्या खालील प्रमाणे...**

१. बिहार सरकारचा बोधगया महाबोधी विहार व्यवस्थापन कायदा (१९४९) रद्द करा.


२. महाबोधी ट्रस्ट ही संपूर्णतः बौद्धांच्या ताब्यात दयावी.

३. ब्राह्मण प्रशासन हटवा.

**आमच्या आंदोलनाची रूपरेषा –** सकाळी १० वाजता नगरपरिषदेच्या समोरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून शांतता मार्च (शांतता रॅली) निघेल.

तहसील कचेरी समोर शांतता रॅली येऊन धरणे आंदोलन सुरू होईल. तरी कृपया शासन व प्रशासनाने दखल घेऊन आमचा आवाज, मागण्या देशाच्या राष्ट्रपतींकडे, पंतप्रधानांकडे पोहचवाव्यात ही नम्र विनंती. अशाप्रकारे निवेदन देऊन बौद्ध बांधवांनी बोधगया येथील महाबोधी विहार मुक्ती आंदोलनाचे शांततेच्या मार्गाने रणशिंग फुंकले आहे.

# पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयात प्रथमच गुडघ्याची यशस्वी शस्त्रक्रिया





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर येथे प्रथमच दुर्बिणीद्वारे संदेश कांबळे (पंढरपूर) या रुग्णावर तुटलेल्या गुडघ्यांच्या शिरांची दुर्मिळ आणि गुंतागुंतीची असणारी शस्त्रक्रिया सोलापूरचे सुप्रसिद्ध आर्थ्रोस्कोपी तज्ञ डॉ. विवेक देगावकर यांनी केली असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश कुमार सुडके यांनी दिली

महात्मा जन आरोग्य योजनेअंतर्गत गुडघ्यांच्या शिरांची मोफत शत्रक्रिया यशस्वी रित्या भूलतज्ञ डॉ अभिजित पाटील यांच्या सहाय्याने पार पडली . सदरची शस्त्रक्रिया जिल्हाशल्याचित्सक डॉ सुहास माने ,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ श्रीकांत कुलकर्णी, वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय डॉ महेश कुमार सुडके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच एमजीपीजे टीम उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर यांच्या प्रयत्नाने यशस्वी झाली.

अशा प्रकारचे आजार असणाऱ्या रुग्णांनी या मोफत शत्रक्रियांचा लाभ घ्यावा असे आवाहन उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर महेश कुमार सुडके यांनी दिली केले आहे.

**प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या सूचना**

**दहावीच्या परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्या**

# दहावीची परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : इयत्ता दहावीच्या उर्वरित पेपर साठीची परिक्षा अत्यंक कडक आणि शिस्तबध्द घेण्यात याव्यात. तालुक्यात बोर्डाच्या परीक्षेसाठी निश्चित करण्यात आलेल्या केंद्रावर गैरप्रकार होणार नाही दक्षता घेवून दहावीची परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडावी तसेच परिक्षेसाठी कॉपी करणारा आणि कॉपी करण्यासाठी मदत करणाऱ्या शैक्षणिक संस्था आणि पालकांवर देखील कारवाई करण्यात येईल अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.



तालुक्यात कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी शेतकी भवन, पंचायत समिती पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, नायब तहसिलदार वैभव बुचके यांच्यासह परिक्षा केंद्राचे केंद्रप्रमुख उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे म्हणाले, सध्या दहावी व बारावीची बोर्ड परीक्षा सुरू आहे. उर्वरित पेपरसाठी कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेवून आवश्यक उपाययोजना कराव्यात. कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर कडक व वेळप्रसंगी फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.परिक्षा या कॉपीमुक्त होण्यासाठी भरारी पथक कार्यरत असून त्याव्दारे परिक्षा केंद्रावर निगराणी करण्यात येत आहे. प्रशासनाच्या कॉपीमुक्त अभियानात विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनी सहभागी होवून हे अभियान यशस्वी करण्यास सहकार्य करण्याचे आवाहनही प्रांताधिकारी श्री. इथापे केले आहे.

परीक्षेदरम्यान गोंधळ होऊ नये तसेच परिक्षा केंद्रावर सुरक्षा व्यवस्था चोख राहावी, यासाठी पोलिस प्रशासनाकडून आवश्यक बंदोबस्त ठेवण्यात आल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी यांनी सांगितले

## विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या तिमाही बैठकीचे १० मार्च रोजी आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : पुणे विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची तिमाही बैठक सोमवार १० मार्च २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयाच्या नवीन इमारतीत सभागृह क्र.१ येथे आयोजित करण्यात आली असल्याचे विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे सदस्य सचिव तथा प्र.महसूल अपर आयुक्त समिक्षा चंद्राकार यांनी कळविले आहे.



प्रत्येक तीन महिन्यातून एकदा त्या महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी लोकशाही दिन झाल्यानंतर भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक घेण्यात येते. या बैठकीत तीन महिन्यांत समितीकडे आलेल्या तक्रारी व त्यावर केलेल्या उपाययोजनांबाबत आढावा घेण्यात येतो, असेही प्र.महसूल अपर आयुक्त समिक्षा चंद्राकार यांनी कळविले आहे.

## थोडक्यात...

### स्वाधार योजनेसाठी अर्ज भरण्यास १५ मार्च पर्यंत मुदतवाढ

सोलापूर : अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. या योजनेसाठी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर अर्ज सादर करावयाचे असून अर्ज भरण्याकरिता दि. १५ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. सदर योजनेची व्याप्ती तालुकास्तरापर्यंत वाढविण्यात आलेली असून विद्यार्थ्यांचे उशिरा सुरु होणारे शैक्षणिक सत्र व विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी आदी कारणामुळे विविध विद्यार्थी संघटना, पालक, विद्यार्थी यांचेकडून स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली आहे. याबाबत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी पोर्टल वर अर्ज भरण्यासाठी दि. १५ मार्च २०२५ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे. तसेच यापूर्वी स्वाधार योजनेचा अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांसाठी बँक तपशिल भरण्याबाबतचा टॅब उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदर योजनेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी पोर्टल वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत व यापूवी स्वाधार योजनेचा अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी सदर पोर्टल वरती लॉग इन करून आपला बँक तपशिल भरावा असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

# दहावीच्या उर्वरित पेपर साठी कॉपी होणार नाही यासाठी दक्षता घ्या : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## मास कॉपी होणाऱ्या परीक्षा केंद्राच्या केंद्र संचालकावर व पर्यवेक्षकांवर कठोर कारवाई करावी

**■ सर्व प्रांताधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, गटशिक्षणाधिकारी यांनी त्या त्या तालुक्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र तसेच कॉपीबाबत तक्रार येणाऱ्या परीक्षा केंद्रावर अधिक लक्ष ठेवावे**

**■ जिल्ह्याच्या ११ तालुक्यातील १८४ परीक्षा केंद्रावर ६५,५८५ विद्यार्थी दहावीच्या परीक्षा देत आहेत**

**■ कॉपी, गर्दी व अन्य कारणासाठी जिल्ह्यातील ७६ परीक्षा केंद्र संवेदनशील**

**■ ७ मार्च गणित भाग २, १० मार्च विज्ञान भाग १ व १२ मार्च विज्ञान भाग २ असे तीन पेपर बाकी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर /जिमाका : सध्या दहावी व बारावीची बोर्ड परीक्षा सुरू असून बारावीचा एक तर दहावीचे चार पेपर राहिले आहेत. तरी दहावी व बारावीच्या उर्वरित पेपर साठी एकाही परीक्षा केंद्रावर मास कॉपी अथवा अन्य कोणताही गैरप्रकार होणार नाही यासाठी सर्व प्रांताधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी, तहसीलदार आणि गटशिक्षण अधिकारी यांनी अत्यंत दक्ष राहून परीक्षा सुरळीत पार पाडावी असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.



दहावी व बारावी बोर्ड परीक्षेच्या उर्वरित पेपर साठी कॉपी होऊ नये यासाठी दूरदृश्य प्रणाली द्वारे आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार, शिक्षणाधिकारी माध्यमिक सचिन जगताप, शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख, सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि गट शिक्षण अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की दहावी बारावी परीक्षा सुरू झाल्यापासून नागरिक पत्रकार व मान्यवर व्यक्तीकडून काही परीक्षा केंद्रावर कॉपी व अन्य परीक्षेतील गैरप्रकार सुरू असल्याबाबतच्या तक्रारी येत होत्या त्या अनुषंगाने त्या तक्रारीचे तपासणी केली असता त्यात तथ्य आढळून आलेले आहे त्यामुळे सर्व प्रशासकीय यंत्रणेने विशेषत: शिक्षण विभागाने दहावी-बारावी च्या उर्वरित पेपर साठी अत्यंत काटेकोरपणे नियोजन करून संवेदनशील परीक्षा केंद्राबरोबरच अन्य परीक्षा केंद्रावर कॉपी होणार नाही याची दक्षता घ्यावी. तरीही परीक्षा केंद्रावर कॉपी होत असल्याचे आढळल्यास संबंधित परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षक यास जागेवरच निलंबित करावे तर संबंधित परीक्षा केंद्र चालकावर गुन्हे दाखल करून ते केंद्र पुढील कोणत्याही परीक्षेसाठीचे बंदी आदेश काढावेत, असे निर्देशही यावेळी त्यांनी दिले.

प्रत्येक उपविभागीय अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी त्या त्या तालुक्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र तसेच कॉपीच्या तक्रारी आलेल्या परीक्षा केंद्र चालकांना बोलावून त्यांच्या केंद्रावर उर्वरित पेपरसाठी कॉपी होणार नाही याबाबत अत्यंत कठोरपणे निर्देश द्यावेत, असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. उपविभागीय अधिकारी माळशिरस यांनी शिरपूर येथील परीक्षा केंद्रावर भेट देऊन तेथे कॉपी होत असल्याचे संबंधितांच्या निदर्शनास आणून दिले होते, त्या केंद्रावरील पर्यवेक्षक तसेच केंद्र चालकावर त्वरित कारवाई करावी, असेही त्यांनी निर्देशित केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी कंट्रोल रूमच्या माध्यमातून कॉपी करणाऱ्या केंद्रावर कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच सांगोला, माळशिरस व पंढरपूर तालुक्यातील काही शाळावर कॉपी होत असल्याच्या तक्रारी आलेल्या असून त्याबाबत तपासणी करून पुढील कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी दहावी बारावीच्या परीक्षेच्या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यातील संवेदनशील केंद्र तसेच कॉपी होत असल्याच्या आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित तहसीलदार व गटशिक्षणाधिकारी यांना माहिती देऊन संबंधित केंद्रावर अधिक भरारी पथके तसेच बैठे पथकांची नियुक्ती करण्याबाबत सूचित केले. तसेच पोलीस विभागांनी परीक्षा केंद्र परिसरात १००० मीटर पर्यंत जे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहे त्याचे अत्यंत कठोर अंमलबजावणी करण्याबाबत सूचित केले.

सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये १८४ परीक्षा केंद्रावर दहावी व बारावीची परीक्षा सुरळीतपणे सुरू असून ७६ परीक्षा केंद्र संवेदनशील असल्याचे शिक्षणाधिकारी माध्यमिक सचिन जगताप यांनी सांगितले. दहावीच्या बोर्ड परीक्षेसाठी जिल्ह्यातील ६५ हजार ५८५ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. बारावीचा माहिती तंत्रज्ञान पेपर बाकी असून दहावीचे गणित भाग एक व दोन व विज्ञान भाग एक व दोन असे चार पेपर बाकी असून या सर्व पेपर साठी अत्यंत दक्षपणे कार्यवाही करून परीक्षा सुरळीतपणे पार पाडली जाईल असे त्यांनी सांगितले. तसेच मास कॉपी करणाऱ्या व परीक्षेतील गैरप्रकार करणाऱ्या परीक्षा केंद्रावर तसेच केंद्र चालकावर कठोर कारवाई करण्यात येईल तर संबंधित पर्यवेक्षक यांना जागेवरच निलंबित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. पंढरपूर तालुक्यातील नांदुरे येथील स्टार इंग्लिश स्कूलमध्ये तहसीलदार यांनी तपासणी केली असता फळ्यावर प्रश्नांची उत्तरे लिहून दिली जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित पर्यवेक्षक अमोल पवार व श्रीमती निपाणे यांना त्याच दिवशी निलंबित करण्यात आल्याची माहिती ही त्यांनी यावेळी दिली.



## इंदापूर शहर नागरी संघर्ष समितीच्या वतीने वायरमन डे साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे : आज दिनांक. ४/३/२०२५ रोजी सकाळी ळ११.३० वाजता महावितरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित इंदापूर येथे जाऊन आपल्या जीवाची पर्वा न करता नागरिकांना अहोरात्र वर्षभर वीजेची सेवा देणाऱ्या कर्तव्यनिष्ठ कर्मचाऱ्यांचा वायरमन डे निमित्त सन्मान करून साजरा करण्यात आला .त्यावेळी लाईनमन राहुल पळसे, महेश टफले ,फारुख शेख ,दत्तात्रेय देवकर, विज वितरणचे अधिकारी प्रमोद कुमार जाधव, उप कार्यकारी अभियंता गणेश जाधव उत्तम गायकवाड शिपाई सतीश बनसोडे दीपक चौगुले इ. या कार्यक्रमा वेळी उपस्थित होते. इंदापूर शहर नागरी संघर्ष समितीतर्फे सर्वांना हार ,गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी इंदापूर नागरी संघर्ष समितीचे प्रमुख प्रा.कृष्णा ताटे सर संघर्ष समितीचे मार्गदर्शक हमीदभाई आत्तार, संघर् समितीचे पदाधिकारी महादेव चव्हाण सर, नगर सेवक अमर गाडे, भारत बोराटे, अस्लम बागवान माऊली राऊत इ. अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणातील आरोपींना फाशी व्हावी या मागणीसाठी घाटकोपर शिवसेना पश्चिम विधानसभा क्षेत्राच्या वतीने आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील हादरवणारे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आणि सर्वच स्तरांतून या फोटो नंतर हळहळ व्यक्त करण्यात आली.अतिशय अमानुष पद्धतीनं देशमुख यांना मारहाण करत असूरी वृत्तीनं आरोपींनी हा गुन्हा केला आणि त्याची छायाचित्र,व्हिडीओ सुद्धा काढले.या कृत्याचा निषेध समाजाच्या सर्व स्तरांतून केला जात असून,आता ही मन हेलावणारी दृश्य व्हायरल झाल्यानंतर सर्वच




स्तरातून आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी होत आहे.तसेच शिवसेना घाटकोपर पश्चिम विधानसभा क्षेत्राच्या वतीने घाटकोपर अमृत नगर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी संतोष देशमुख हत्याप्रकरणातील क्रूरकर्मा आरोपी वाल्मीक कराड याला फाशी व्हावी.तसेच या हत्याकांडात जे जे आरोपी आहेत व जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कायद्याद्वारे कठोरातील कठोर कारवाई व्हावी अशी मागणी करत निषेध म्हणून वाल्मीक कराड याच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करत आंदोलन करण्यात आले.यावेळी विधानसभा प्रमुख डॉ.सुबोध बावदाने,माजी नगरसेविका डॉ.भारती बावदाने,माजी नगरसेवक दिपक बाबा हांडे व घाटकोपर पश्चिम विधासभा क्षेत्रातील शिवसेनेचे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.




## श्री. माणकेश्वर वाचनालयात मराठी राजभाषा गौरव दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : श्री माणकेश्वर वाचनालय मराठी राजभाषा तथा कुसुमाग्रज वि.वा. शिरवाडकर जयंती निमित्त साजरी यावेळी श्री माणकेश्वर वाचनालयाचे संचालक राजेंद्र खालकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी मराठी राजभाषा गौरव दिनाविषयी आपले मनोगत व्यक्त केले याप्रसंगी, वाचनालयाचे चिटणीस बाळासाहेब कापसे, संचालक राहुल दावते, हिशोब तपासणीस दत्ता काका उगावकर, सुहास सुरळीकर, गुरु जगदीश कुलकर्णी, नितीन बनसोडे नंदू पुंड आदी उपस्थित होते.

## आमदार मनोज कायंदे यांना मंत्रिपद मिळणार का ? जिल्हा वाशियांचे मंत्रालयाकडे लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : धनंजय मुंडे हे ओबीसी समाजाचा चेहरा म्हणून मंत्रालय मध्ये मंत्री होते त्यांनी आज आपल्या मंत्री पदाचा राजीनामा दिल्यामुळे ओबीसी चेहरा म्हणून आमदार मनोज कायंदे यांचे नाव मंत्री पदासाठी चर्चेत आले आहे त्यामुळे बुलढाणा जिल्हा वाशी यांचे संपूर्ण लक्ष हे मंत्रालयाकडे लागून आहे आमदार मनोज कायंदे यांना प्रशासनाचा चांगला अनुभव असल्यामुळे त्यांना मंत्री पद भेटू शकते अशी जिल्हा वाशीयांची अपेक्षा आहे म्हणून आमदार मनोज कायंदे यांनी जिल्हा परिषद मध्ये एका जिल्हा परिषद सर्कल मधून तीन वेळेस जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधित्व केले होते तसेच त्यांनी त्यांच्या काळामध्ये जिल्हा परिषद चा कार्यकाळ सुद्धा त्यांनी विकास कामाने चांगलाच चर्चेत राहिला होता तसेच ते या पूर्वी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष . महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस पदावर सुद्धा राहिलेले आहे त्यामुळे त्यांचे सर्वच पक्षातील लोका सोबत चांगलें सबंध राहिले आहे तसेच त्यांना प्रशासनातील मोठा अनुभव असल्यामुळे त्यांना मंत्रिपद मिळू शकते अशी अपेक्षा बुलढाणा जिल्हा वाशीयांची आहे. सावखेड भोई जिल्हा परिषद सर्कल मधील त्यांच्या विकासकामाने चेहरा मोहरा बदलून टाकलेला आहे त्यामुळेच ते आज जिल्हा परिषद सदस्य ते आमदार झाले आहे त्यामुळे त्यांचा जनसंपर्क दांडगा असल्यामुळे त्यांना मंत्रिपद मिळावे अशी बुलढाणा जिल्हा वाशियांची अपेक्षा आहे

## महिलांच्या बचत गटामुळे ग्रामविकासाला दिशा मिळाली : सचिन जाधव

### कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या श्रम संस्कार निवासी शिबिरा मध्ये ग्राम विकासावर परिसंवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट: खरा भारत खेड्यामध्ये आहे, असे महात्मा गांधी म्हणत असत. त्यांचे बोधवचन ग्रामीण भागातील महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून सत्यात उतरविले आहे, तसेच राज्यातील महिलांच्या योगदानामुळे ग्रामविकासाला गती मिळाली आहे. असे प्रतिपादन जिल्हा परिषद कार्यक्रमाधिकारी सचिन जाधव यांनी व्यक्त केले.



महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था,अक्कलकोट संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने करजगी येथे आयोजित केलेल्या विशेष श्रम संस्कार निवासी शिबिरात ग्राम विकासामध्ये महिलांचे योगदान या परिसंवाद कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सौ शांभवी सचिन कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर सरपंच विवेकानंद उंबरजे, श्री बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दयानंद उंबरजे, उपसरपंच शब्बीर पटेल, पूनम कोकळगी, ग्रामपंचायत सदस्या सुषमा येळमेळी, संगीता गंगदे, दस्तगीर गोडीकट्टी हे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी कुटुंबाचा विकास केला आहे, आता सेंद्रिय शेती करण्याची वेळ आली आहे परसबाग तयार करून आर्थिक विकास करण्याची संधी आली आहे.

शांभवीताई कल्याणशेट्टी म्हणाल्या की, करजगी गाव पुरोगामी आहे, गावात ९२ बचत गट असून यातील अनेक महिला स्वतःचे उद्योग सुरू केले आहेत. महिलांनी परसबागा तयार करावीत, सोबत पशुपालनाचा व्यवसाय देखील करावा, ग्रामीण भागात पायाभूत सुविधा आहेत रस्ते, आरोग्य केंद्र, बँका इत्यादी योजना कार्यरत आहेत. त्यामुळे जलद गतीने गावचा विकास होत आहे.

परिसंवाद प्रसंगी सरपंच विवेकानंद उंबरजे व त्यांचे बंधु दयानंद उंबरजे यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचा प्रारंभ दीप प्रज्वलन करून झाला.

स्वागत प्रा. राजशेखर पवार यांनी केले, प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले. सूत्रसंचालन समर्थ पवार यांनी केले तर ग्रामविकास अधिकारी कोळी यानी उपस्थितांचे आभार मानले.

### मोबाईल व दुचाकी चोर अवघ्या २४ तासात पोलिसांनी केले जेरबंद

## दुचाकी चोरीचा तपास लावण्यात निफाड पोलिसांची यशस्वी कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरी गेलेल्या मोटरसायकल चा २४ तासात तपास लावण्यात निफाड पोलिसांना यश आले असून या प्रकरणात एक विधी संघर्षित बालकाचा सहभाग असल्याचा संशय आला आहे, चौकशी दरम्यान इतरही गुन्ह्यांचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले आहेत,

याबाबत निफाड पोलिसांकडून मिळालेल्या अधिक माहितीनुसार दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी निफाड तालुक्यातील पिंपळस रामाचे येथून एक प्लेटिना दुचाकी चोरी गेली




होती या प्रकरणी तपास काम सुरू असताना घटनास्थळा च्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरा तपासणी करताना सदर गुन्ह्यांमध्ये एक विधी संघर्षित बालकाचा हात असल्याचे लक्षात आले. सदर विविध संघर्षित बालकाची चौकशी केली असता निफाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन मोटरसायकल आणि ओझर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एक मोटरसायकल यांच्या चोरीचा छडा लागला आहे.

एम एच १५ जी वाय ३४ ३२, एम एच १५ डी ९३ ५५, एम एच १५ ९५,या क्रमांकाच्या तीन दुचाकी दोन मोबाईल हँडसेट आणि २५० रुपयांची नाणी असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे ,मोटरसायकल चोरीची फिर्याद दाखल झाल्यानंतर २४ तासाच्या आत तपास करून गुन्ह्याचा यशस्वी शोध लावण्याचे उल्लेखनीय काम निफाड पोलीस पथकाने बजविले आहे नाशिक जिल्हा ग्रामीण पोलीस चे अधीक्षक विक्रम देशमाने, अप्पर अधीक्षक आदित्य मिरखेलकर, निफाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर निलेश पालवे, आणि निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव, यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अंमलदार साळवे, खरात, ढिकले सांगळे, दरोडे, गायकवाड, विकास जाधव, विनोद जाधव, आणि सागर जाधव, यांनी तपास कमी परिश्रम घेतले.